# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** सातारा **P.S.(ठाणे):** कराड शहर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0340 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**25/03/2025 14:09

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 20/03/2025

**Date To ( दिनांक पर्यंत):** 24/03/2025

**Time From (वेळेपासून):** 16:50 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 13:55 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 25/03/2025 **Time (वेळ):** 14:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 051

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 25/03/2025 14:08 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** संभाजीनगर मार्केट शेजारी, पॉकेट कॅफेसमोर, कराड,कराड

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री हर्षद दत्तात्रय बदामी

(b) **Father's Name (वडील चे नाव) :** दत्तात्रय

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1988

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1. | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 468, सोमवारपेठ कराड,कराड,कराड शहर,सातारा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | 468, सोमवारपेठ कराड,कराड,कराड शहर,सातारा,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8329406128

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | लोकसेवक शंकर खंदारे मुख्याधिकारी नगरपरिषद कराड | | | 1. कराड,कराड शहर,सातारा, महाराष्ट्र,भारत |
| 2 | लोकसेवकस्वानंद दिलीप शिरगुप्पे | | | 1. फ्लट नं 201, संकल्प प्राईड, देसाई नगर कराड ,कराड शहर, सातारा,महाराष्ट्र,भारत |
| 3 | तौफिक कय्युम शेख | | | 1. कराड,कराड शहर,सातारा, महाराष्ट्र,भारत |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 4 | अजिंक्य अनिल देव | | | 1. सोमवार पेठ, कराड ,कराड शहर,सातारा,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाच रक्कम 5,00,000/ रू. (पाच लाख रुपये) रोख रक्कम | 500,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-) (चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

500,000.00

**11. Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

खबरी जबाब दिनांक 25/03/2025

मी श्री हर्षद दत्तात्रय बदामी, वय 37 वर्षे, शिक्षण- डिप्लोमा सिव्हील, व्यवसाय - बांधकाम व्यवसाय, रा. 468, सोमवारपेठ कराड ता.कराड जि. सातारा मो.नं. 8329406128

मी वरील ठिकाणचा कायमचा रहिवाशी असून मी माझ्या कुटुंबासह एकत्रासह एकत्रित राहत असून मी कराड येथे बांधकाम व्यवसाय करत असून मी गेले 8 वर्षापासून हा व्यवसाय करीत आहे. सदर व्यवसायाची मी कोणतीही फर्म तयार केलेली नाही.

मी दिनांक 20/03/2025 रोजी ए.सी.बी, सातारा येथील डीवायएसपी श्री राजेश वाघमारे साहेब यांना फोनकरून माझ्याकडें करण्यात येणाऱ्या लाचेच्या मागणी बाबत थोडक्यात तक्रार सांगितली. परंतू मला ए. सी. बी. सातारा कार्यालयात येण्यास जमणार नाही. तरी तुम्हीच कराड जि. सातारा येथे येवून तक्रारी नुसार पुढील कारवाई करावी अशी विनंती मी डीवायएसपी वाघमारे साहेब यांना केली. त्यावर डीवायएसपी वाघमारे साहेब यांनी मला कारवाईचे पुढील नियोजन थोडक्यात सांगितले.

त्या नियोजनानुसार दिनांक 20/03/2025 रोजी 16.50 वाचे सुमारास डीवायएसपी, वाघमारे साहेब यांचे सुचनेनुसार मी माझी असलेल्या मित्राची चारचाकी एमजी ऍस्टर कार क्रमांक एमएच 10 डीक्यु 8479 या वाहनामधून नगरपरिषदेचे जलशुद्धीकरण केंद्र, कराड येथे आलो असता त्या ठिकाणी डीवायएसपी वाघमारे हे त्यांचे सहकाऱ्यासह शासकीय वाहनामध्ये हजर होते. तेव्हा डीवायएसपी वाघमारे साहेब यांनी मला त्यांचे शासकीय वाहनात बसवून माझी ओळख करून घेवून त्यांचे सह असणाऱ्या दोन पंचांची व सापळा पथकातील पोहवा गोगावले, पोहवा ताटे यांची एकमेकांना ओळख करून दिली. डीवायएसपी वाघमारे साहेब यांनी मला माझे तक्रारीबाबत विचारणा केली असता मी त्यांना तक्रार सांगितली की, मी कराड येथील रहिवाशी असून कराड शहरात मी बांधकाम व्यवसाय करतो सदर व्यवसायाची मी कोणतीही फर्म तयार केलेली नाही. मला मिळेल तसे काम मी करत असतो. मला मराठी हिंदी व इंग्रजी भाषेचे ज्ञान आहे.

सध्या माझे मालकीचे कराड शहरातील सि.स. क्र.79, सोमवार पेठ, कराड येथील जागेत पार्किंग अधिक पाच मजली इमारतीचे पुनर्विकास बांधकामचे काम प्रस्तावित आहे. सदर इमारतीच्या पुनर्विकास बांधकाम परवानगीसाठी मी सन 2017 मध्ये नगरपरिषद कराड येथे अर्ज केला होता. त्यानुसार मला बिल्डींग परमीट क्र. 1942 दिनांक 23/05/2017 अन्वये बांधकाम परवानगी मिळाली होती. काम सुरु न झाल्याने मी सन 2019 पर्यंत त्या कामाची मुदतवाढ घेतली होती.

सदर काम सुरु न झाल्याने मी पुन्हा दिनांक 22/11/2021 मध्ये बांधकामाची सुधारीत परवानगी मिळणेबाबत अर्ज केला होता. त्यानुसार मला दिनांक 24/11/2023 रोजी परवानगी मिळाली. परंतु दरम्यानचे काळात नियमावलीत बदल झाल्याने नवीन नियमानुसार सुधारित पुनर्विकास बांधकाम परवानगी मिळणेबाबतचा अर्ज मी दिनांक 21/12/2023 रोजी सादर केलेला आहे. सदर अर्जाप्रमाणे मला साधारण 2000 स्के.फु. वाढीव एफएसआय मिळणे अपेक्षित आहे.

दरम्यान मी सदरबाबत कराड नगरपरिषद येथील सहा. नगर रचनाकार श्री स्वानंद शिरगुप्पे यांचेकडे माझ्या बांधकाम परवानगीचे कामाबाबत पाठपुरावा करीत असताना माझीं खाजगी इसम अजिंक्य देव याच्याशी माझ्या कामाच्या अनुषंगाने चर्चा होत असे तो देखील बांधकाम व्यावसायिक असल्याने त्याचे देखील कराड नगरपरिषद येथे बांधकाम विभागात येणे जाणे असल्याने आम्ही ऐकमेकांच्या परिचयात होतो.

दिनांक 10/03/2025 रोजी कॅफे इमॅजीका, कराड येथे मी, अजिंक्य देव व श्री शिरगुप्पे असे भेटलो असता सदर सुधारित पुनर्विकास बांधकाम परवानगीनुसार तुम्हास मिळणाऱ्या अतिरीक्त एफएसआयचे क्षेत्र हे साधारणपणे 2000 स्केअर फुट इतके असून त्याचे चालु बाजारभावाप्रमाणे अंदाजे 80 लाख रुपये तुम्हाला अतिरिक्त फायद्या स्वरुपात मिळणार आहेत. त्यामुळे सदर वाढीव एफएसआयचे बाजारभावाप्रमाणे मिळणा-या रकमेचे अंदाजे 10 ते 12 टक्के प्रमाणे साधारण 10 लाख रुपये खर्च करायची तुम्ही तयारी ठेवली पाहीजे असे समक्ष भेटून समक्ष सांगितले होते. माझी सुधारित पुनर्विकास बांधकाम परवानगीची फाईल मंजूर करण्याचे अधिकार हे मुख्याधिकारी, नगरपरिषद कराड यांना असून माझी फाईल ही सहायक नगररचनाकार शिरगुप्पे यांचे मार्फतीने तपासूनच मुख्याधिकारी साहेबांकडे जात असते ही कार्यपद्धती मला माहित असल्याने शिरगुप्पे हे माझ्याकामाकरिता माझ्याकडेच 10 लाख रुपये लाचेची मागणी करत असलेबाबतची माझी खात्री झाल्याने मी तशी माझी तक्रार पंचासमक्ष डीवायएसपी वाघमारे साहेब यांना सांगितली व आज मी आज दिनांक 20/03/2025 रोजी मी स्वानंद शिरगुप्पे यांची मॅवरिक कॅफे, वाकान रोड, कराड याठिकाणी त्यांची भेट घेवून त्यांनी माझ्याकडे मागणी केलेल्या लाच रक्कमेबाबत चर्चा करणार आहे. अशी माझी हाताने लिहिलेली तक्रार डीवायएसपी वाघमारे साहेब यांना दिली असता डीवायएसपी वाघमारे साहेब व पंचांनी ती वाचुन बधितीली व त्यावर सह्या केल्या.

त्यानंतर डीवायएसपी वाघमारे साहेब यांनी मला पंचासमक्ष पडताळणी कारवाईची माहिती दिली व प्रक्रिया समजावून सांगितली. त्यानुसार डीवायएसपी वाघमारे साहेब यांनी मला व पंचांना पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने आवश्यक त्या सुचना दिल्या व माझ्या टी शर्टचे आत मध्ये असलेल्या बनीयनला पीनच्या सहाय्याने व्हाईस रेकॉर्डर सुरु करून लावून दिले व तेथून 18.57 सुमारास मी व पंच नंबर 1 विठ्ठल कोळेकर यांचेसोबत माझेकडील एमजी ॲस्टर चारचाकी गाडी मधून जलशुद्धीकरण केंद्र कराड येथून मॅवरिक कॅफे, वाकान रोड, कराड येथे लोकसेवक शिरगुप्पे सहाय्यक नगररचनाकार, नगरपरिषद कराड यांची भेट घेणे कामी रवाना झालो. त्यावेळी डीवायएसपी वाघमारे साहेब व त्यांचे सहकारी त्यांचे शासकीय वाहनात जलशुद्धीकरण केंद्र, कराड येथेच थांबून राहिले.

मी व पंच नंबर 1 विठ्ठल कोळेकर असे वाकान रोड, कराड येथील मॅवरिक कॅफे चे अलीकडे वाहन थांबवून तेथून चालत मॅवरिक कॅफे येथे आलो. तेथे शिरगुप्पे साहेब, सहायक नगररचनाकार तसेच खाजगी इसम अजिंक्य देव यांचेशी माझे कामासंदर्भाने चर्चा केली. त्यावेळी मी शिरगुप्पे साहेबांना, "ठिक हाय मग तुमचा जो काय निरोप असेल तो असे म्हणालो असता लोकसेवक शिरगुप्पे हे मी यांना सुद्धा काय डिरेक्टली देत नाय, माझी जी असतील माणसं ती यांच्याशी बोलतील मी सुद्धा यांच्याशी बोलत नाय" असे म्हणाले. त्याचवेळी मित्र अजिंक्य हा म्हणाला की, "ह्याच्या आधी जो निरोप आलाय, तो हाय तसा पोहोचवलाय" त्यावर,"मी कुणाशी कम्युनेट कोणाबर करू, ह्याच्याबर करू" असे म्हणालो असता, लोकसेवक शिरगुप्पे हे, "हां, तुम्ही ह्यांच्याशी बोला" असे म्हणाले, त्यानंतर मी त्यांना, म्हणजे तुम्ही जी गोष्ट बोलताय ती गोष्ट मी ह्याच्याकडनं कॉर्डीनेट करायची म्हणजे, याचा शब्द हा तुमचा शब्द हाय असे म्हणालो असता लोकसेवक शिरगुप्पे यांनी, "आता तर तस हाय, आपण हे करू ते बाकीच्या गोष्टी तर कारण सीओ साहेब तर अशा अवस्थेत असतील ना कारण उदया तर असे असणार हाय इस हाथ दे इस हाथ ले" असे म्हणाले. त्यानंतर अजिंक्य यास मी, मला एक सांग....ह्यांना उद्या कमीत कमी किती द्यायचे असे म्हणालो. तेव्हा अजिंक्य याने मला, टोटल त्यांनी 10 सांगितले....सहा तरी द्यायला लागतील... पाच ते सहा, आज तारीख आहे वीस एकवीस तारखेला पाच लाख रुपये दे असे म्हणून लोकसेवक शिरगुप्पे यांचे सांगणेवरून त्यांचे उपस्थितीत अजिंक्य याने माझ्याकडे दहा लाख रुपयाची मागणी करून पहिला हप्ता म्हणून उदया एकवीस तारखेला पाच लाख रुपये आणून देण्यास सांगितले. त्यानंतर मी व पंच नं. 1 कोळेकर असे माझे चारचाकी वाहनामधून डीवायएसपी वाघमारे साहेब व पथक थांबले वाहनाजवळ परत 20.38 वाचे सुमारास आलो. तेव्हा त्यांनी माझेकडील व्हाईस रेकॉर्डर घेवून बंद केला. त्यानंतर त्यांनी विचारलेवरून मी घडलेली हकीकत सांगितली. तेव्हा डीवायएसपी वाघमारे साहेब व पंचानी माझ्याकडील व्हॉईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकून खात्री करुन घेतली की, स्वानंद

शिरगुप्पे, सहा. नगररचनाकार, नगरपरिषद, कराड यांचे सांगणेवरून अजिंक्य देव यांचे करवी त्यांचे उपस्थितीत माझे कडे 10,00,000/- रूपये लाचेची मागणी करून त्यापैकी पाहिला हप्ता 5,00,000/- रु लाच रक्कम एकवीस तारखेला आणून देण्यास सांगितले असल्याची डीवायएसपी वाघमारे साहेब व पंचाची खात्री झाल्याने पडताळणी कारवाई स्थगित करून पुढील सापळा कारवाई दिनांक 21/03/2025 रोजी करण्याचा निर्णय डीवायएसपी वाघमारे साहेबांनी पंचांचे सहमतीने घेतला.

त्यानंतर दिनांक 21/03/2025 रोजी डीवायएसपी वाघमारे साहेब यांनी मला संपर्क करून कराड येथील शाही हॉटेल येथे येण्यास सांगितले त्याप्रमाणे मी शाही हॉटेल, कराड येथे 09.30 वाचे सुमारास येवून थांबलो असता त्याठिकाणी डीवायएसपी वाघमारे, पंच व पथक आले. त्यांनी दिनांक 20/03/2025 रोजीचे पडताळणी दरम्यान लोकसेवक शिरगुप्पे व खाजगी इसम अजिंक्य देव यांनी माझ्याकडे दहा लाख रुपयचे लाचेची मागणी केली असून ते आज दिनांक 21/03/2025 रोजी लाचेचा पाहिला हप्ता पाच लाख रुपये स्विकारणार असल्याने त्याबाबत सापळा पुर्व व सापळा कारवाईची माहिती थोडक्यात सांगून प्रक्रिया समजावून सांगितली. त्यानंतर डीवायएसपी वाघमारे साहेब यांचे सांगणेवरुन माझ्याकडे असलेली 5,00,000/- रु रुपये लाचेची रक्कम म्हणुन पंचासमक्ष हजर केली. त्यानुसार डीवायएसपी वाघमारे साहेब यांनी दिले सुचनेवरून सहकाऱ्यांनी मी हजर केलेल्या लाचेच्या रक्कमेच्या नोटाचे नंबर लॅपटॉपवर टंकलिखित केले. त्यादरम्यान लाच रक्कम घेवून येण्याबाबत खाजगी इसम अजिंक्य देव यांचा मला फोन आला नसल्याने डीवायएसपी वाघमारे साहेब यांनी खाजगी इसम अजिंक्य देव यास फोन करण्यास सांगून त्यांचेकडील व्हॉईस रेकार्डर चालू केला. त्यावेळी माझा मोबाईल क्रमांक 8329406128 वरून खाजगी इसम अजिंक्य देव याचा मोबाईल क्रमांक 9921400901 यावर स्पिकर ऑन करून संपर्क करून माझ्या बांधकामाचे परवानगी बाबतीतील कागदपत्रांच्या पुर्ततेबाबत चर्चा केली. त्यामध्ये, मी त्याला ठिक आहे आपण साधारण किती वाजेपर्यंत भेटायचं मी काय.. का एवढं करून घेवूनच तेव्हा खाजगी इसम अजिंक्य देव याने तुझं झालं की मला फोन कर हे टेक्निकल संपल की फोन कर, आणि बाकीचं जुळवाजुळव करून तुझ्या पाशी ठेव मी सांगतो तुला कधी पण फोन करीन, ठिक आहे पैसे हा दुय्यम भाग आहे. पहिल जर टेक्नीकली व्यवस्थीत असेल तर पुढचे सगळे विषय झाले असे म्हणाला त्यावर मी ठिक आहे, काय प्रॉब्लेम नाय सांग मला तस आणि तोपर्यंत मी कागदपत्राच उरकून घेतो असे म्हणालो. ती वेळ 12.59 वाची होती. त्यानंतर डीवायएसपी वाघमारे साहेब व पंचाची माझ्याकडील कागदपत्रांची पुर्तता झाल्यानंतरच खाजगी इसम अजिंक्य देव हे लाच रक्कम स्विकारणार असल्याची खात्री झाल्याने सदरची कारवाई स्थगित करीत असल्याचे डीवायएसपी वाघमारे यांनी सांगितले. व मी हजर केलेली लाच रक्कम रु 5,00,000/- मला परत देवून पुन्हा परत येताना ती रक्कम सोबत घेवून येण्याच्या सुचना दिल्या.

त्यानंतर पुन्हा दिनांक 22/03/2025 रोजी 15.15 वाचे सुमारास डीवायएसपी वाघमारे साहेब व सापळा पथक कराड येथील जलशुद्धीकरण केंद्र येथे येवून सापळा कारवाईचे आयोजन केले. डीवायएसपी वाघमारे साहेब यांचे सुचनेनुसार खाजगी इसम अजिंक्य देव हा कुठे भेटायला बोलावणार आहे. याची खात्री करण्यासाठी 17.25 वाचे सुमारास व्हाईस रेकॉर्डर चालू करून माझा मोबाईल क्रमांक 8329406128 वरून खाजगी इसम अजिंक्य देव याचा मोबाईल क्रमांक 9921400901 यावर स्पिकर ऑन करून संपर्क केला असता त्यामध्ये मी सह्या वगैरे झाल्यात, कुठे भेट घेवू असे विचारले असता खाजगी इसम अजिंक्य देव याने राजयोग, त्यावर मी राजयोग.... फाईल, फाईल घेवून येतो येताना काय कमी जास्त असेल तर सांग मला असे बोलून भेटायला बोलविले. त्यानंतर वाघमारे साहेबांनी पुन्हा पडताळणी करावयाची असल्याने माझे टीशर्टच्या आतमध्ये बनियला पिनच्या सहाय्याने व्हाईस रेकॉर्डर चालू करून खाजगी इसम अजिंक्य देव याची भेट घेणेकामी राजयोग स्टेशनरी कडे 17.36 वाचे सुमारास रवाना केले. त्यावेळी खाजगी इसम अजिंक्य देव हे हजर नव्हते त्यानंतर मी त्यांना फोन करून यार यार कु कुठाय? असे विचारले असता खाजगी इसम अजिंक्य देव यान मी आम्ही इथ पोपटभाई चहा आपला असे सांगितले त्यावेळी मी तिकड काशाला गेलाय तू? असे विचारले असता खाजगी इसम अजिंक्य देव याने आम्ही नॅचरल ग्लास मध्ये आलोय असे सांगीतले त्यानंतर मी व पंच क्रं 1 राजयोग स्टेशनरी येथून नॅचरल ग्लास येथे गेलो. तिथे पोहचल्यानंतर मी पुन्हा खाजगी इसम अजिंक्य देव यास फोन केला व कुठय विचारल तेव्हा खाजगी इसम अजिंक्य देव हा माझ्याकडे आला व म्हणाला बर, असूदे जरा जावूया का दोन मिनीट असे म्हणाला. तेव्हा मी कुठे जायचं असे विचारले असता खाजगी इसम अजिंक्य देव याने हिंदुस्तान मार्बलमध्ये असे सांगितले. तेव्हा तेथे जात असताना माझेकडील बांधकाम परवाना कामाची फाईल दिली. तेव्हा त्याने चलन उद्या दिनांक 23/03/2025 रोजी मिळणार असल्याचे सांगून लाच रक्कमेची तयारी करून ठेवण्यास सांगितल्याचे डीवायएसपी वाघमारे आणि पंचांची व्हाईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकून खात्री झाल्याने सदरची सापळा कारवाई स्थगित करण्यात आली.

त्यानंतर पुन्हा दिनांक 23/03/2025 रोजी 12.20 वाचे सुमारास डीवायएसपी वाघमारे साहेब व सापळा पथक कराड येथील फर्न हॉटेलचे शेजारील मोकळी जागा येथे येवून सापळा कारवाईचे आयोजन केले. त्या दरम्यान माझे

मोबाईलचे व्हॉटसॲप वरती लोकसेवक स्वानंद शिरगुप्पे यांचा मिस्ड कॉल आला त्यामुळे लागलीच डीवायएसपी वाघमारे साहेब यांनी लोकसेवक शिरगुप्पे हे कुठे भेटायला बोलवत आहेत याची खात्री करण्यासाठी 14.23 वाचे सुमारास व्हाईस रेकॉर्डर चालू करून माझा मोबाईल क्रमांक 8329406128 चे व्हॉटसॲप वरून शिरगुप्पे यांचा मोबाईल क्रमांक 8983206620 चे व्हॉटसॲप वरती स्पिकर ऑन करून संपर्क करण्यास सांगितले. त्याप्रमाणे लोकसेवक शिरगुप्पे यांना संपर्क केला त्यामध्ये माझ्या बांधकामाच्या परवान्याबातच्या कागदपत्राची चर्चा झाली तेव्हा लोकसेवक शिरगुप्पे यांनी हा, तेच एक्चुअली काय झालयं शेख साहेब जरा बाहेर गेलेत त्यांना एक व्हॉटसॲप ला आलय संक्शन, तुम्ही दिला ना तो, असे म्हणाले असता मी त्यांना हो दिला, दिला असे म्हणालो त्यावर लोकसेवक शिरगुप्पे बर, कलेक्ट करतील आणि ते तुम्हाला सांगतील असे म्हणाले. ते व्हाईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकून डिवायएसपी वाघमारे साहेब यांची नगरपरिषद, कराड येथील शेख साहेब बाहेर गेले असल्यामुळे आज चलन मिळणार नसल्याची खात्री झाल्याने सदरची सापळा कारवाई स्थगित करण्यात आली.

आज दिनांक 24/03/2025 रोजी 09.30 वाचे सुमारास डीवायएसपी वाघमारे साहेब व सापळा पथक कराड येथील जलशुद्धीकरण केंद्र येथे येवून हजर होवून सापळा कारवाईचे आयोजन केले. डीवायएसपी वाघमारे साहेब यांनी व्हाईस रेकॉर्डर चालू करून खाजगी इसम अजिंक्य देव यास संपर्क करून भेट घेणेबाबत चर्चा करणाची सुचना दिली. डीवायएसपी वाघमारे साहेब यांचे सुचनेवरून मी 10.58 वाचे सुमारास माझा मोबाईल क्रमांक 8329406128 वरून खाजगी इसम अजिंक्य देव याचा मोबाईल क्रमांक 9921400901 यावर स्पिकर ऑन करून कॉल केला तेव्हा त्याने तु साईडवर जा तुला माणूस पाठवतो साईटवर असे म्हणाला. तेव्हा मी त्याला कोण येणार आहे असे विचारले असता, तो मला, दोन जन हायत दोघ पण फोन उचलेना झालेत असे म्हणाला. म्हणून त्यास माझे साईटवर जावून थांबतो असे म्हणालो तेव्हा तो ओके असे म्हणाला. त्याचा फोन लवकर येत नसल्याने पुन्हा मी 11.41 वाचे सुमारास फोन करून मी माझे साईटवर जाऊन थांबणार असल्याचे सांगितले. त्यास त्याने होकार दिल्या. तो चलन घेवून माझे कडील पैसे घेवून जाण्यासाठी कुणाला तरी पाठवणार असल्याचे डीवायएसपी वाघमारे साहेबांनी व्हाईस रेकॉर्डर मध्ये सेव्ह झालेले संभाषण ऐकून सापळा पुर्व कारवाई करण्याचा निर्णय घेतला. त्याप्रमाणे त्यांनी मला व पंचांना सापळा कारवाई बाबत माहिती थोडक्यात समजावून सांगून सुचना दिल्या. मला माझेकडील 5,00,000/- रु रक्कम हजर करण्यास सांगितली. त्याप्रमाणे मी लाच रक्कम कापडी पिशवीसह हजर केली. त्यानंतर डीवायएसपी वाघमारे साहेब यांनी अँथ्रासीन पावडरचे गुणधर्म समजावून सांगितले. त्यांच्या सहकाऱ्यांनी पंचासमक्ष सापळापुर्व पंचनाम्याची कारवाई पुर्ण केली त्यामध्ये मी हजर केलेल्या लाच रक्कमेच्या दोन्ही बाजूस तसेच कापडी पिशवीस अँथ्रासिन पावडर लावली व सदरची अँथ्रासिन पावडर लावलेली पिशवी माझ्याकडे देवून लोकसेवक यांनी लाच रक्कम दिल्या नंतर डाव्या हाताने डोक्यावरून दोनदा हात फिरवून इशारा करण्याच्या सुचना डीवायएसपी वाघमारे साहेब यांनी मला दिल्या.

त्यानंतर डीवायएसपी वाघमारे साहेब यांनी त्यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर माझ्या टीशर्टच्या आतमध्ये असलेल्या बनीयनला पीनच्या सहाय्याने लावून चालू करून तेथून 12.50 वाचे सुमारास पंच नंबर 1 कोळेकर असे आम्ही माझेकडील एमजी ॲस्टर चारचाकी गाडीमधून माझे सोमवार पेठ येथील बांधकामाचे साईटवर रवाना झालो. आमचे पाठोपाठ डीवायएसपी वाघमारे साहेब व पथक हे त्यांचेकडील वाहनाने रवाना झाले. त्यानंतर थोडया वेळाने मला माझे मोबाईल नंबर वरती खाजगी इसम अजिंक्य देव याचा फोन आला. त्यावेळी त्याने आता फोन झाला माझा, एक दहा मिनीट लागतील म्हणून सांगितलयं असे म्हणाला. तेव्हा मी त्याला बरं असे म्हणालो. त्यावेळी खाजगी इसम अजिंक्य देव याचेशी कामासंबंधाने चर्चा केली. त्यामध्ये त्याने संभाजी मार्केटपाशी जातो का? असे सांगितले. तेव्हा मी त्याला सभाजी मार्केट तिकडं कोण हाय आता असे म्हणालो. तेव्हा तो शेख साहेबांना पाठवलये त्यांना व्हॉटसॲपवर कॉल कर व कॅश पण त्यांना दे आणि चलन पण त्यांच्याकडूनच घे ओके ना असे म्हणाला. त्यावर मी त्यास बर म्हणून मी व पंच असे माझे कडील चारचाकी वाहनाने संभाजी मार्केट येथे पोहोचलो. तेथे पोहोचल्यानंतर मी लोकसेवक शेख यांना स्पीकर ऑन करून कॉल केला करून त्यांना संभाजी मार्केट येथे पोहोचलो असल्याचे सांगितले. त्यावेळी पंच नं. 1 हे माझे सोबत माझ्या गाडीमध्ये होते. त्यानंतर थोडया वेळाने लोकसेवक शेख हे माझ्या चारचाकी गाडीमध्ये येवून बसले. त्याचेशी माझ्या कामासंबंधाने चर्चा केली चर्चेमध्ये लोकसेवक शेख यांनी मी तयार केलंय सगळं बाकी सह्याच फक्त असे म्हणून माझ्याकडे उजव्या हाताचा अंगठा तर्जनीवर घासून इशारा केला तेव्हा मी त्यांना उजव्या हाताने लाच रक्कम ठेवलेली कापडी पिशवी लोकसेवक शेख यांचेकडे देवून मोजून घ्या असे म्हणालो त्यावर ते एवढया मोजू असे म्हणाले असता मी त्यांना बंडल मोजून घ्या म्हणत नाही मी पाचशेच्या नोटा कमी जास्त नाय असे म्हणालो तेव्हा त्यांनी बंडल मोजत बोलले एक, दोन, तीन, चार, पाच, सहा, सात, आठ, नऊ तेव्हा मध्येच मी नऊ कशी असतील असे म्हणालो असता शेख हे दहा, त्यामुळे तुम्ही म्हणला दिवस वाईट आलेत आमचे काय करणार असे म्हणाले त्यानंतर माझे कामाबाबत त्यांचेशी चर्चा केली व मला शंकर खंदारे, तत्कालीन

मुख्याधिकारी यांचे दिनांक 06/03/2025 रोजीचे यांचे स्वाक्षरीचे चलन व नोटीस दिली त्यानंतर लोकसेवक शेख, मी व पंच नं.1 असे गाडीतून खाली उतरलो. व बाजूला येवून माझे डोक्यावरून डावा हात दोनदा फिरवून पथकास दिसेल असा लोकसेवक शेख यांनी लाच रक्कम स्विकारलेचा पुर्वनियोजीत इशारा केला असता डीवायएसपी वाघमारे साहेब यांनी माझ्याकडील व्हॉईस रेकॉर्डर बंद करुन त्यांचे ताब्यात घेतला. व त्यांचे सहका-यानी लोकसेवक शेख यांना ताब्यात घेतले. तेव्हा डीवायएसपी वाघमारे साहेब यांनी लोकसेवक शेख यांना त्यांची ओळख सांगून पंच नं 1 यांना लाचेची रक्कम कोणी स्विकारली याबाबत विचारणा केली असता लाच रक्कम ही शेख यांनी स्विकारली असल्याचे सांगितले. त्यांना डीवायएसपी वाघमारे साहेब यांनी अँथ्रासीन पावडर लावलेल्या लाच रक्कमेसह ताब्यात घेतले. ती वेळ 13.55वा. ची होती.
त्यानंतर डीवायएसपी वाघमारे साहेब यांनी त्यांचे खाजगी वाहनामध्ये बसवून सापळा कारवाई दरम्यान रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकले. तसेच खाजगी वाहनामध्ये काळा पडदा लावून कृत्रिम अंधार करून अँथ्रासीन पावडर लागलेल्या नोटांची व माझ्या लोकसेवक शेख यांच्या हातांची ऍल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात निरीक्षण कारवाई केली. त्यानंतर डीवायएसपी वाघमारे साहेब यांनी नगरपरिषद, कराड येथे जावून माझ्या कामासंबंधाची कागदपत्रे पंचासमक्ष जप्त केली. व सापळा पंचनाम्याची पुढील कारवाई शासकीय विश्रामगृह, कराड येथे जावून करण्याचे निश्चित केले.

तरी 1) लोकसेवक शंकर खंदारे, तत्कालीन, मुख्याधिकारी, नगरपरिषद कराड, वर्ग-1 यांनी त्यांना दिनांक 20/03/2025 रोजी मुख्याधिकारी नगरपरिषद कराड या पदावरून कार्यमुक्त केले असताना देखील आरोपी लोकसेवक स्वानंद शिरगुप्पे यांच्याशी संपर्क करुन शंकर खंदारे यांनी माझे सुधारीत बांधकाम परवाना करीता आवश्यक असलेल्या चलनावर दिनांक 24/03/2025 रोजी स्वाक्षरी करून सदर चलनावर 06/03/2025 रोजीचे कार्यालयीन जावक केले असल्याचे दाखवून पदाचा गैरवापर करून लाच मागणीस प्रोत्साहन दिले तसेच एकंदरीत लोकसेवक शंकर खंदारे, मुख्याधिकारी, लोकसेवक स्वानंद शिरगुप्पे, सहायक नगररचनाकार व तौफिक शेख, कनिष्ठ लिपिक यांचे व्हॉटसऍप मधील चॅटींग, फाईल्स व व्हाईस कॉलची माझे व दोन्ही पंचासमक्ष डीवायएसपी वाघमारे यांनी पाहणी करून अवलोकन केले असता लोकसेवक शेख यांनी तक्रारदार यांचे कामाबातचे विना सहीचे जावक क्रमांक व तारीख नमूद नसलेले चलन व धोकादायक इमारत नोटीस ही दिनांक 24/03/2025 रोजी सकाळी 07.56 वाजाता लोकसेवक स्वानंद शिरगुप्पे यांना व्हॉटसऍप द्वारे पाठविली. त्यानंतर स्वानंद शिरगुप्पे यांनी दिनांक 24/03/2025 रोजी मुख्याधिकारी शंकर खंदारे यांना 09.56 वाजता 4 मिनटे व्हॉटसऍप व्हाईस कॉलवरून संभाषण केले आहे. त्यानंतर 10.27 वाजता व्हॉटसऍपवर लोकसेवक शंकर खंदारे, मुख्याधिकारी यांना विना सहीचे व विना जावक क्रमांकाचे चलन व धोकादायक नोटीस व्हॉटसऍप द्वारे शिरगुप्पे यांनी पाठविली. त्यानंतर लोकसेवक खंदारे यांनी सदर चलनावर व धोकादायक इमारत नोटीशीवर त्यांची स्वत:ची स्वाक्षरी करून ती पुन्हा परत लोकसेवक स्वानंद शिरगुप्पे यांना दिनांक 24/03/2025 रोजी 10.53 वाजता पाठविली. त्यानंतर लोकसेवक शिरगुप्पे यांनी सदर सही झालेले चलन व धोकादायक इमारत नोटीस ही लोकसेवक शेख यांना दिनांक 24/03/2025 रोजी 10.57 वाजता पाठविले. त्यानंतर शिरगुप्पे यांनी 11.10 वाजता शंकर खंदारे यांना 26 सेकंदाचा व 11.12 वाजता 1 मिनीट व्हॉईस कॉल केल्याचे दिसत आहे. त्यानंतर लोकसेवक शेख यांनी सदर सही झालेले चलन हे दिनांक 06/03/2025 रोजीचे जावक क्रमांक 1297 व धोकादायक इमारत नोटीस दिनांक 15/09/2023 रोजीचे जावक क्रमांक 4956 या मागील तारखेचे जावक करून ते लोकसेवक शेख यांनी मला लाच रक्कम स्विकारताना झालेल्या चर्चेवेळी दिली. तसेच 2) लोकसेवक स्वानंद दिलीप शिरगुप्पे, वय - 32 वर्षे पद सहाय्यक नगररचनाकार, वर्ग-2 नगरपरिषद, कराड सध्या रा. फ्लॅट नं 201, संकल्प प्राईड, देसाई नगर कराड जि. सातारा मुळ रा. मु.पो.कोडोली ता.पन्हाळा जि. कोल्हापूर यांनी तक्रारदार यांचेकडे खाजगी इसम अजिंक्य देव यांचे मार्फतीने लाचेची मागणी केली. लोकसेवक 3) तौफिक कय्युम शेख वय-40 वर्षे नोकरी- कनिष्ठ लिपिक, बांधकाम विभाग, नगरपरिषद कराड वर्ग- 3 याने खाजगी इसम क्र. 4) अजिंक्य अनिल देव, रा. सोमवार पेठ, कराड यांचे सांगणेवरून संभाजी मार्केट, कराड येथे लाच रक्कम स्विकारून गुन्ह्यास प्रोत्साहन दिले आहे तसेच खाजगी इसम क्र. 4 अजिंक्य अनिल देव, रा. सोमवार पेठ, कराड याने लोकसेवकासाठी लाचेची मागणी केली आहे म्हणून माझी त्यांचे विरुद्ध कायदेशीर फिर्याद आहे.

माझा वरील खबरी जबाब माझे सांगणेप्रमाणे संगणकावर मराठीमध्ये टंकलिखीत करण्यात आला असून तो बरोबर असल्याची खात्री करून मी त्यावर सही केली आहे.

समक्ष हा जबाब दिला.

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

RAJU ANANDA TAHSILDAR(I (Inspector)) / PNMH50695 **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-यांची सही/अंगठा):**

**15. Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** RAJU ANANDA TAHS
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PNMH50695

पोलीस स्टेशन ऑफिसर
कराड शहर पोलीस ठाणे
जि. सातारा
दि. 25/09/2025